# १०.
# शेळी-मेंढी विकास महामंडळ, पुणे-१६

पशुसंवर्धन माहिती पुस्तिका

## १०. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे – ४११ ०१६

| | | |
|---|---|---|
| **१** | **महामंडळाची स्थापना** | **कंपनी कायदा १९५६ अन्वये ८ ऑगस्ट १९७८**<br>**प्रत्यक्ष कार्यास सुरूवात दिनांक १ नोंव्हेंबर १९७९ पासून** |
| **२** | महामंडळाची प्रमुख उद्दिष्टे | **महामंडळाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.**<br>(अ) महाराष्ट्रात विदेशी/स्थानिक/संकरित मेंढ्यांची पैदास प्रक्षेत्रे स्थापने, विस्तार करणे आणि/अथवा त्या पुनर्गठीत करणे.<br>(ब) मेंढ्यांच्या पैदाशीकरिता उपयुक्त ठिकाणी अशा केंद्रांची वाढ करणे.<br>(क) मेंढ्या आणि मेंढ्यांपासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंची आयात-निर्यात करणे, मेंढ्यांची पैदास करणे आणि विक्री करणे.<br>(ड) स्थानिक मेंढ्यांची जात सुधारण्यासाठी संकरित पैदास कार्यक्रम हाती घेणे/अथवा अशा कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाला मदत करणे.<br>(इ) मेंढ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून मेषपालकांना प्रतिमेंढी मिळणाऱ्या उत्पादनांत वाढ होऊन मेषपालन व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शासनाच्या मदतीने/मदतीशिवाय मेष विस्तार केंद्रे स्थापणे.<br>(ई) शासनामार्फत सहकारी तत्वावर अथवा व्यक्तिगत किंवा भागीदारीत मेष पालन व्यवसाय चाल-विण्यास उद्युक्त करणे, आर्थिक मदत देणे, व्यवस्थापनात मदत करणे. |
| **३** | अधिकृत भांडवल | **रुपये ५.०० कोटी** |
| **४** | भरणा झालेले भागभांडवल | **रुपये ४.८४ कोटी** |
| **५** | सध्याचे शासकीय/ अशासकीय संचालक मंडळ | अशासकीय सदस्य<br>**मा. ना. रमेशभाऊ शेंडगे,** **अध्यक्ष**<br>(राज्यमंत्री दर्जा)<br>**शासकीय सदस्य**<br>१. मा. आयुक्त, पशुसंवर्धन संचालक<br>२. मा. उपसचिव (पदुम) मंत्रालय, मुंबई संचालक<br>३. डॉ. सु. ना. बगाडे, व्यवस्थापकीय संचालक |
| **६** | महामंडळाचे कार्यक्षेत्र | १. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र बिलाखेड, ता. चाळीसगाव, जि. जळगाव<br>२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पडेगांव, जि. औरंगाबाद<br>३. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र अंबेजोगाई, जि. बीड<br>४. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र मुखेड, जि. नांदेड<br>५. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र महुद, ता. सांगोला, जि. सोलापूर<br>६. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र तिर्थ बु॥, ता. तुळजापुर, जि. उस्मानाबाद<br>७. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र दहिवडी, ता. माण, जि. सातारा<br>८. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र रांजणी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली<br>९. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पोहरा, जि. अमरावती<br>१०. लोकर उपयोगिता केंद्र व मुख्यालय, मेंढीफार्म, गोखलेनगर, पुणे - ४११ ०१६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | कर्मचारी वर्ग | अ) वर्ग १ व २ - ११<br>ब) वर्ग ३ - ५५<br>क) वर्ग ४ - २४४<br>**एकूण** **३१०** |
| ८ | प्रक्षेत्रावरील एकूण जमीन | अ) एकूण क्षेत्र २३२५.६२ हेक्टर<br>ब) बागायत क्षेत्र १०३.९७ हेक्टर<br>क) जिरायत क्षेत्र १५६.५५ हेक्टर<br>ड) चराऊ कुरण, इमारती, रस्ते, तलाव इ. २०६५.१० हेक्टर |
| ९ | पशुधन संख्या (ऑक्टोबर २०११ नुसार) | मेंढ्या : २४५८<br>शेळ्या : ३१४४<br>**एकूण : ५६०२** |
| १० | महामंडळाची वार्षिक उलाढाल | रु. १०.०० कोटी |
| ११ | प्रक्षेत्रे चालविण्या-साठी सन २०११-२०१२ ची सहाय्यक अनुदान तरतूद | रु. ५३८.२३ लाख |

| | | वर्ष | (अ) नफा/ (-) तोटा (रु.) लाख | संचित नफा/तोटा (रु.) लाख |
|---|---|---|---|---|
| १२ | महामंडळाचा मागील ०५ वर्षातील नफा/तोटा | २००५-२००६ | (+) ३.६४ | (-) ९२.१६ |
| | | २००६-२००७ | (+) २०.०८ | (-) ७२.०७ |
| | | २००७-२००८ | (+) ५.८२ | (-) ६६.२५ |
| | | २००८-२००९ | (+) ८.३२ | (-) ५७.९३ (तात्पुरता) |
| | | २००९-२०१० | (+) १३.७१ | (-) ४४.२२ (तात्पुरता) |

| | | |
|---|---|---|
| १३ | महामंडळाच्या प्रक्षेत्रांमार्फत राबविण्यात येणारे विकासात्मक कार्यक्रम व योजना | १. प्रक्षेत्रावर सुधारित जातीच्या शेळ्यां-मेंढ्यांची पैदास करून त्यापासून उत्पादित होणारे सुधारित जातीचे मेंढेनर व बोकड मेंढपाळ / शेतकऱ्यांना पैदाशीसाठी पुरवठा करणे.<br>२. प्रक्षेत्रावर ३ दिवसाचे शेळी-मेंढीपालनचे प्रशिक्षण दरमहा आयोजित करून लाभधारकांना या प्रशिक्षणाचा फायदा देऊन राज्यात स्वयंरोजगार उपलब्ध करणे.<br>३. मेंढपाळांच्या मेंढ्यांची यांत्रिक पध्दतीने लोकर कातरणी करणे.<br>४. विविध शासकीय योजनातंर्गत शेळ्या-मेंढ्यांचे गटवाटप करणे, लसीकरिता शेळ्या-मेंढ्यांचा पुरवठा करणे, बकरीईद कार्यक्रमाकरिता बोकड पुरवठा करणे.<br>५. मेंढपाळांची लोकर रास्त दरात खरेदी करणे, लोकरवस्तू निर्मिती आणि विक्री करणे.<br>६. केंद्रीय लोकर विकास मंडळ, वस्त्रोद्योग मंत्रालय, जोधपूर यांच्या आर्थिक सहाय्याने एकात्मिक मेष व लोकर सुधार प्रकल्प, वूलन एक्स्पो तसेच मेंढपाळांसाठी आणि मेंढ्यांसाठी विमा योजना इ. राबविण्यात येत आहेत.<br>७. मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित उस्मानाबादी शेळीचे पैदास व विकास केंद्र स्थापन करणे / शेळ्यांचे गटवाटप करणे.<br>८. माडग्याळ मेंढ्यांचे संवर्धन आणि विकास कार्यक्रम राबविणे.<br>९. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत शेळी-मेंढी पैदास ग्राम योजनेमध्ये शेतकऱ्यांकडील शेळ्या-मेंढ्यांची प्रतवारी सुधारण्याकरिता १०० % अनुदानावर जातीवंत मेंढेनर/बोकडांचा पुरवठा करणे.<br>१०. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत शेळ्या-मेंढ्यांसाठी स्वतंत्र बाजाराची स्थापना करणे.<br>११. केंद्र पुरस्कृत शेळ्या/मेंढ्या व ससे यांचा एकात्मिक विकास अंतर्गत प्रक्षेत्र बळकटीकरण करणे.<br>१२. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत शेळ्या-मेंढ्याच्या सुधारित जातीचा विकास करण्यासाठी प्रक्षेत्रांचे बळकटीकरण करणे. |

**१४. योजनेत्तर योजनेखाली १० मेष व शेळी विकास प्रक्षेत्रासाठी मंजूर सहाय्यक अनुदान आणि प्रक्षेत्रावरील कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर अनुषंगिक बाबीसाठी झालेला खर्च यासंबंधीचे विवरणपत्र**

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-१२ (तरतूद) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्राचा खर्च | ३१७.१० | ३५२.४६ | ४४६.७० | ९४७.०५ | ५८०.३१ |
| २. | वजा प्रक्षेत्राचे उत्पन्न | ३८.९४ | ३८.६८ | ३३.१० | ४८.३४ | ४२.०८ |
| ३. | निव्वळ खर्च | २७८.१६ | ३१३.७८ | ४१३.६० | ८९८.७२ | ५३८.२३ |
| ४. | शासनाचे सहाय्यक अनुदान | २७८.१४ | ३१२.९३ | ४१३.३८ | ८९८.७२ | ५३८.२३ |

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित चे कार्य

### १. सुधारित जातीचे मेंढेनर व बोकड यांचे पैदाशीकरिता वाटप करणे

महामंडळाच्या विविध प्रक्षेत्रावर उत्पादित होणारे सुधारित जातीचे मेंढेनर व बोकड पैदाशीसाठी वाटप करण्यात येतात. महामंडळामार्फत सन २००४-२००५ मध्ये ७१५ मेंढेनर आणि ४६६ बोकड, २००५-२००६ मध्ये ६४५ मेंढेनर व ६५३ बोकड आणि २००६-२००७ मध्ये ९१४ मेंढेनर ५९५ बोकडांचे वाटप करण्यात आले. तसेच सन २००७-२००८ मध्ये ८०४ मेंढेनर १४२८ बोकड आणि २००८-२००९ मध्ये मेंढेनर ९६८, बोकड ८१९ आणि २००९-२०१० मध्ये २१८ मेंढेनर व ६१५ बोकड पैदाशीसाठी वाटप करण्यात आले आहेत. सन २०१०-११ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शेळी-मेंढी पैदास ग्राम योजनेमध्ये एकूण ४८१२ बोकड/मेंढेनराचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

### २. यांत्रिक लोकर कातरणी

मेंढीपालक पारंपरिक पध्दतीने लोकर कातरणी करतात. त्यामुळे लोकरीच्या धाग्याचे बारीक तुकडे होवून प्रतवारी कमी होते. त्यासाठी महामंडळामार्फत विजेवर चालणाऱ्या विदेशी यंत्राद्वारे मेंढ्यांची लोकर रु. १.५० प्रति मेंढी प्रमाणे कातरणी करून दिली जाते.

### ३. मेंढी व शेळी पालन प्रशिक्षण योजना

मेंढी व शेळीपालन व्यवसाय व्यवस्थापनाचे तीन दिवसाचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षणाची सोय महामंडळाच्या सर्व प्रक्षेत्रावर उपलब्ध करून देण्यात येते व त्यासाठी रुपये २५०/- प्रशिक्षणार्थी शुल्क आकारले जाते. दरवर्षी सरासरी १५०० शेळी-मेंढी पालकांना प्रशिक्षण देण्यात येते.

### ४. रास्त किंमतीवर लोकर खरेदी आणि लोकरीच्या वस्तूची निर्मिती व विक्री

लोकरीच्या प्रतवारीनुसार पाहणी करून व उपयोगानुसार रास्त भावाने महामंडळ मेंढपाळांकडील लोकर, किफायतशीर भावाने खरेदी करते. सदर लोकरीपासून स्थानिक उत्पादकाकडून जेन निर्मिती करून घेण्यात येते, त्यामुळे स्थानिकरित्या स्वयंरोजगार निर्माण होण्यास मदत होत आहे.

महामंडळामार्फत लोकरीच्या शाली, ब्लँकेटस यावर सतरंज्या, गालीचे, आसने, जीन इत्यादी वस्तूंची निर्मिती करून त्याचा ग्राहकांना माफक दरामध्ये पुरवठा करण्यात येतो. सरासरी दरवर्षी रु. ३०.०० लाख लोकर वस्तूची विक्री करण्यात येत आहे.

### ५. माडग्याळ मेंढ्यांचे संवर्धन व विकास कार्यक्रम

माडग्याळ ही मांसासाठी प्रसिध्द असलेल्या मेंढ्यांची जात आहे. या जातीच्या मेंढ्या प्रामुख्याने सांगली जिल्ह्यामध्ये आढळतात. या मेंढ्यांच्या संवर्धनासाठी महामंडळाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास केंद्र शासनाने सन २००५-२००६ मध्ये मंजूरी देवून रु. ६४.५० लाख महामंडळास निधी उपलब्ध करून दिला होता. सदर योजनेंतर्गत ५०० माडग्याळ मेंढ्या आणि २० मेंढेनर खरेदी करून महामंडळाच्या रांजणी प्रक्षेत्रावर पैदास सुरू केलेली आहे. तसेच यामधून वाडे बांधकाम, बोअरवेल, लॅबोरेटरी बांधकाम, ट्रॅक्टर खरेदी, विहीर खोदाई इ. कामे पूर्ण करण्यांत आलेली आहेत. या प्रकल्पामधून दरवर्षी १०० माडग्याळ जातीचे शुध्द मेंढेनर पुरवठा करणेचे उद्दिष्ट आहे. सन २००९-२०१० मध्ये या प्रकल्पासाठी रु. १०.०० लाख निधी केंद्र शासनाने मंजूर केला आहे. त्यामध्ये १०० माडग्याळ मेंढ्या खरेदी करून पैदास करण्यात येत आहे. तसेच पाईपलाईन व इतर विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

### ६. केंद्रीय लोकर विकास मंडळ, वस्त्रोद्योग मंत्रालय, जोधपूर पुरस्कृत एकात्मिक लोकर सुधार प्रकल्प (सांगली व सोलापूर)

सांगली व सोलापूर हे जिल्हे दुष्काळप्रवण जिल्हे असून तेथें मेंढपाळ पंरपरागत पध्दतीने अनेक शतकापासून मेषपालन व्यवसाय करतात. या भागातील लोकर आखूड धाग्याची व जाडीभरडी आहे. या लोकरीचा उपयोग प्रामुख्याने घोंगड्या आणि जीन यांचे उत्पादनासाठी होतो. मेषपालन व्यवसाय हा पूर्णतः ग्रामीण व्यवसाय आहे. हा व्यवसाय भटक्या स्वरुपात केला जात असल्याने, मेंढपाळांना विविध नैसर्गीक आपत्ती, रोगराई यांना तोंड द्यावे लागते, म्हणून केंद्रीय लोकर विकास मंडळाने **"एकात्मिक लोकर सुधार प्रकल्प"** ही योजना राबविण्याचे सुरू केले आहे.

या योजनेंतर्गत सांगली व सोलापूर जिल्ह्यातील १,००,००० मेंढया दत्तक घेऊन त्यांना आरोग्यसुविधा, मेंढे नर वाटप, पणन, प्रशिक्षण या सुविधा देण्यांत येत आहे. या योजनेखाली ११९ गांवातील २३८६ मेंढपाळांच्या १.०० लाख मेंढ्या दत्तक घेण्यांत आल्या आहेत. या योजनेखाली सन २००९-२०१० मध्ये मंजूर निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(रुपये लाख)**

| अ.क्र. | बाब | युनिट | मंजूर निधी | खर्च | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००९-१० | २००९-१० | २०१०-११ | |
| १ | आरोग्य सुविधा | १,००,००० मेंढ्या | १३.०० | ५.५६ | ५.३४ | १०.९० |
| २ | मेंढे नर वाटप (रुपये ३,०००/-प्रति नर) | १००० नर वाटप | २१.०० | - | ११.७६ | ११.७६ |
| ३ | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, महुद, जिल्हा सोलापूर यांचे बळकटीकरण | - | - | - | - | - |
| ४ | बहुउद्देशीय विस्तार केंद्राची स्थापन | - | - | - | - | - |
| ५ | लोकर प्रतवारी व पणन | १,००,००० मेंढ्या | १.५० | ०.७५ | ०.७० | १.४५ |
| ६ | महामंडळाचे सेवाशुल्क (रुपये ३/-प्रती मेंढी) | - | २.०० | २.०० | - | २.०० |
| ७ | प्रकल्प सर्व्हे | - | १.०० | १.०० | - | १.०० |
| | **एकूण** | **-** | **३८.५०** | **९.३१** | **१७.८०** | **२७.११** |

केंद्रीय लोकर विकास मंडळाने दिनांक ३ ऑगस्ट २००९ च्या आदेशानुसार सन २००९-२०१० वर्षात रुपये ५५.०० लाखापैंकी पहिला हप्ता रुपये ३८.५० लाख महामंडळास अदा केलेला आहे. त्यामधून आरोग्य सेवा व इतर बाबीवर रुपये ९.३१ एवढा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच सन २०१०-२०११ मध्ये रुपये १७.८० लाख खर्च झालेला आहे. सन २०११-१२ मध्ये रुपये ३२.५० लाख महामंडळास मंजूर करण्यात आलेला आहे.

### ७. पुणे येथे वूलन एक्स्पोचे आयोजन

केंद्रीय लोकर विकास मंडळाच्या अर्थ सहाय्याने देशातील ग्रामीण कारागिरांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून सन २००४ पासून महामंडळ, पुणे येथे राष्ट्रीय स्तरावर वूलन एक्स्पो प्रदर्शन आयोजित करीत आहे. या प्रदर्शनामध्ये देशातील विविध राज्यातील कारागीर भाग घेत असतात. चालूवर्षी पुणे येथे वूलन एक्स्पो २०१० आयोजित करण्यात आला होता. यामध्ये गुजरात, राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र इ. राज्यातील ५० कारागिरांनी भाग घेतला होता. या प्रदर्शनामध्ये एकूण रुपये ३०.३९ लाख किंमतीच्या लोकर वस्तूंची विक्री झालेली आहे.

### ८. केंद्रीय लोकर विकास मंडळ पुरस्कृत मेंढपाळांसाठी विमा योजना

केंद्रीय लोकर विकास मंडळाने जानेवारी २००८ मध्ये मेंढपाळांसाठी केंद्रीय भेड पालक विमा योजना राबविणे सुरू केले असून या योजनेखाली खालीलप्रमाणे वार्षिक वर्गणी आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मेंढपाळाचा हिस्सा | : | रु. ८०/- |
| २. केंद्रीय लोकर विकास मंडळाचा हिस्सा | : | रु. १५०/- |
| ३. भारतीय जीवन विमा निगम | : | रु. १००/- |
| **एकूण :** | | **रु. ३३०/-** |

या योजनेखाली सन २००७-२००८ मध्ये १३०८ मेंढपाळांचा विमा आणि सन २००८-२००९ मध्ये ३२५४ मेंढपाळांना विमा उतरविण्यांत आलेला आहे. सन २००९-२०१० मध्ये २९३७ मेंढपाळांचा विमा उतरविण्यांत आलेला आहे. सन २०१०-११ मध्ये ३०५१ मेंढपाळांचा विमा उतरविण्यात आलेला आहे. तसेच विद्यार्थांना शिष्यवृत्ती अंतर्गत सन २००८-२००९ मध्ये ४८ विद्यार्थ्यांना, सन २००९-१० मध्ये ३३३ विद्यार्थ्यांना आणि सन २०१०-११ मध्ये २७० विद्यार्थांना या योजनेखाली शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे.

### ९. मेष विमा योजना

केंद्रीय लोकर विकास मंडळाच्या अर्थसहाय्याने आणि ओरिएंटल इन्श्युरन्स कंपनी यांचे सहकार्याने महाराष्ट्र राज्यातील मेंढ्यांसाठी प्रथमच मेष विमा योजना सन २००९-२०१० या वर्षापासून राबविण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे. या योजनेखाली सांगली व सोलापूर जिल्ह्यातील १,००,००० मेंढ्यांचा विमा उतरविण्याचे उद्दिष्ट आहे. योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. मेंढ्यांचा वयोगट | : | १ ते ९ वर्ष |
| २. प्रिमियम | : | रु. ३८/- प्रतिमेंढी |
| ३. लाभधारक हिस्सा | : | रु. १९/- प्रतिमेंढी |
| ४. केंद्रीय लोकर विकास मंडळाचा हिस्सा | : | रु. २४/- प्रतिमेंढी |
| ५. योजनेखाली देण्यांत येणारी भरपाई | : | रु . १२००/- प्रतिमेंढी |

ही योजना सन २००९-२०१० मध्ये प्रथमच राबविण्यांस सुरुवात झालेली आहे. सन २००९-२०१० मध्ये १६८० मेंढ्यांचा विमा उतरविण्यांत आला आहे. सन २०१०-२०११ मध्ये ५२०४ मेंढ्यांचा विमा उतरविण्यात आलेला आहे.

### १०. मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत उस्मानाबादी शेळीचे पैदास व विकास केंद्र, तुळजापूर (तीर्थ) जिल्हा उस्मानाबाद येथे स्थापन करणे.

मराठवाडा विकास कार्यक्रम अंतर्गत उस्मानाबादी शेळीचे पैदास व विकास केंद्र स्थापन करण्यासाठी शा.नि.क्र. मविआ. १०७५/प्र.क्रमांक ३६०/पदुम-३, दिनांक १२ ऑगस्ट २००८ च्या शासन निर्णयानुसार रुपये ५.०० कोटी एवढा निधी महामंडळास उपलब्ध करून देण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार महामंडळास खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यांत आला आहे.--

| अ. क्र. | योजनेचे नांव | मंजूर आराखडा | **मंजूर निधी** | | | २०११-१२ प्रस्तावित |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | |
| १ | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद येथे अद्ययावत संशोधन प्रयोगशाळा बांधकाम आणि प्रक्षेत्र विस्तारीकरण. | ११२.५० | १००.०० | १२.५० | - | - |
| २ | उस्मानाबाद येथील बाजार समितीच्या आवारात शेळयांच्या बाजारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे. | २२.०० | - | २२.०० | - | - |
| ३ | उस्मानाबाद जिल्ह्यातील शुध्द उस्मानाबादी शेळयांचे सर्वेक्षण करणे | १५.५० | - | १५.५० | - | - |
| ४ | प्रसिद्धी आणि प्रसार | १.२० | - | १.२० | - | - |
| ५ | उस्मानाबादी जातीच्या शेळयांचे गट ५० टक्के अनुदानावर वाटप<br>१० (+) १ शेळी गट (६२० गट) | ३४८.८० | - | - | ३१५.०० | ३३.८० |
| | **एकूण** | **५००.००** | **१००.००** | **५१.२०** | **३१५.००** | **३३.८०** |

या योजनेखाली सन २००८-२००९ मध्ये मंजूर रुपये १.०० कोटी निधी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र तुळजापूर येथे लॅबोरेटरी, वाडे, गोडावून, पाण्याची टाकी, सायलोपीट, डिपींग यार्ड व फेन्सींग तसेच शेळ्या वाहतुकीसाठी मिनी ट्रक खरेदी यासाठी वापरण्यात आला आहे. सन २००९-२०१० मधील रुपये ५१.२० लाख निधी प्रक्षेत्र विस्तारिकरण उस्मानाबाद येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कार्यालय, शेड, पाण्याची टाकी, फेन्सींग, इत्यादी कामासाठी वापरण्यात आली. तसेच पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाकडून उस्मानाबादी शेळ्यांचे सर्वेक्षणाचे काम करुन घेण्यासाठी सन २०१०-२०११ मध्ये रुपये ३१५.०० लाख निधी १० + १ चे ६२० शेळ्यांचे गट ५०% अनुदानावर वाटप करण्यांसाठी वापरण्यात येत आहे.

**११. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत शेळी-मेंढी पैदास ग्राम कार्यक्रम :**

राज्यातील शेळ्या-मेंढ्यांची प्रतवारी सुधारावी या हेतुने राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत शेळी-मेंढी पैदास ग्राम योजना मंजूर करण्यांत आलेली आहे. या योजने अंतर्गत राज्यातील ३३ जिल्ह्यात ३६००० शुध्द जातीवंत बोकड/मेंढेनर १००% अनुदानावर वाटप करण्याचे उद्दिष्ट आहे. सन २०१०-११ मध्ये महामंडळास प्राप्त निधी रुपये १.०० कोटीमधून एकूण १७८८ मेंढेनर/बोकडांचे वाटप करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत सन २०११-१२ मध्ये महामंडळाला रुपये १.५० कोटी निधी प्राप्त झालेला असून, यामधून ३०२४ बोकड / मेंढे नरांचा पैदासीकरिता पुरवठा करण्यात आलेला आहे.

**१२. केंद्र पुरस्कृत रवंथ करणारे लघु प्राणी व ससे यांचा एकात्मिक विकास अंतर्गत प्रक्षेत्र बळकटीकरण :**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जातीवंत शेळ्या-मेंढ्यांचा पुरवठा होण्यासाठी केंद्र शासनामार्फत राबविण्यांत येणाऱ्या रवंथ करणारे लघु प्राणी व ससे यांचा एकात्मिक विकास या योजने अंतर्गत महामंडळाच्या सहा प्रक्षेत्राचे बळकटीकरण करण्यांत येणार आहे. या योजनेचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र | प्रस्तावित निधी (रु. लाख) |
|---|---|---|
| १ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र बिलाखेड, ता. चाळीसगांव, जि. जळगांव | ५०.०० |
| २ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पडेगांव, ता. जि. औरंगाबाद. | ५०.०० |
| ३ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र अंबेजोगाई, ता. जि. बीड, | ४२.०० |
| ४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र मुखेड, ता. जि. नांदेड. | ५०.०० |
| ५ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र महूद, ता. सांगोला, जि. सोलापूर. | ५०.०० |
| ६ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र दहिवडी, ता. माण, जि. सातारा. | ४१.०० |
| | **एकूण** | **२८३.००** |

या योजनेखाली सन २०१०-११ मध्ये केंद्र शासनाने रु. १००.०० लाख एवढा निधी मंजूर केलेला असून त्याअंतर्गत पडेगांव आणि बिलाखेड येथील विकास कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

**१३. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेळ्या-मेंढ्यांकरिता बाजार स्थापन करणे**

सध्या राज्यात शेळ्या/मेंढ्यांची खरेदी-विक्री ही जिवंत वजनावर न होता नगावर होत आहे. यामध्ये मध्यस्थांकडून नेहमी शेळी/मेंढी पालकाची पिळवणूक केली जाते. शेळ्या/मेंढ्यांची विक्री ही ग्रामीण भागातील आठवडी बाजारांतूनही केली जाते. हे बाजार राज्यातील विविध कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भरविले जातात. परंतु, या बाजारांमध्येही शेळ्या/मेंढ्यांकरिता स्वतंत्र बाजाराची व्यवस्था नसून एकाच ठिकाणी सर्व जनावरांचा बाजार भरविला जातो. तसेच सदर बाजारांमध्येही शेळ्या/ मेंढ्यांकरिता वासे, पाणी व खाद्याची सुविधा इ. मूलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी राज्यात संघटित बाजारांची स्थापना होणे आवश्यक आहे.

राज्यात शेळ्या-मेंढ्यांकरिता संघटित बाजाराची संकल्पना लोकप्रिय व्हावी, शेळ्या/मेंढ्यांची खरेदी-विक्री ही जिवंत वजनावर होऊन शेळी-मेंढी पालकांची पिळवणूक न होता त्यांना योग्य दर मिळावे या हेतूने राज्यातील निवडक १० कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारात शेळ्या-मेंढ्यांच्या विक्री करिता स्वतंत्र बाजार स्थापन करण्याकरिता आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा पुरविण्याकरिता महामंडळाने योजना प्रस्तावित केली होती. त्यानुसार शासनाने या योजनेस मान्यता दिली असून योजनेच्या अंमलबजावणीस सुरूवात करण्यात आलेली आहे.

**१४. सन २०१०-२०११ मध्ये ठाणबंद पध्दतीने शेळी-मेंढी पालन योजने अंतर्गत रुपये २५.०० कोटी मंजुरीबाबतचा प्रस्ताव**

महामंडळास मेंढपाळ समाजाच्या विकासासाठी रुपये २५.०० कोटी एवढा निधी शेळयांचे गटवाटप करण्यासाठी देणेबाबत शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेळी-मेंढीपालकांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने २०% अनुदान आणि ६% व्याजदराने कर्ज देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. महामंडळास उपलब्ध होणाऱ्या रुपये २५.०० कोटी निधीमधून प्रस्तावित करण्यात येणाऱ्या शेळीगटासाठी आवश्यक असलेल्या अनुदान आणि कर्जाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

| अ. क्र. | तपशील | १० + १ | २० + १ | ५० + २ | १०० + ४ |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रतिगट किंमत | रु. ८६,४००/- | १,६५,१६२/- | ३,९३,६००/- | ७,८७,२२१/- |
| २ | प्रस्तावित गटांची संख्या (लाभधारक) | १४४२ | ३१९ | १३४ | ४० |
| ३ | शासनाचे लागणारे अर्थसहाय्य | | | | |
| अ) | अनुदान २० टक्के (रु. लाख) | २४९.१८ | १०५.३७ | १०५.४८ | ६२.९७ |
| ब) | कर्ज ७५ टक्के ६ टक्के व्याजदराने (रु. लाख) | ९३४.४५ | ३९५.१५ | ३९५.५७ | २३६.१६ |
| **क)** | **एकूण** | **११८३.६१** | **५००.५२** | **५०१.०५** | **३१४.८८** |
| | **एकूण २५००. ०६ लाख म्हणजेच २५००.०० लाख** | | | | |

**योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे-**

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | ग्रामीण भागातील गोरगरीब आणि बेरोजगारासाठी बंदिस्त शेळी पालन गटवाटप योजना |
| २ | योजना राबविणारी प्रक्षेत्रे | महामंडळाची ९ प्रक्षेत्रे आणि मुख्यालय |
| ३ | प्रस्थापित करावयाच्या गटाचा प्रकार | अ. १० शेळया + १ बोकड ब. २० शेळया + १ बोकड<br>क. ५० शेळया + २ बोकड ड. १०० शेळया + ४ बोकड |
| ४ | प्रस्थापित करावयाचे गट | राज्यातील ३३ जिल्ह्यामध्ये खालीलप्रमाणे गट प्रस्थापित करण्यात येतील.<br>अ. १० शेळया + १ बोकड : १४४२ ब. २० शेळया + १ बोकड : ३१९<br>क. ५० शेळया + २ बोकड : १३४ ड. १०० शेळया + ४ बोकड : ४० |
| ५ | शेळयांच्या गटाची किंमत | **प्रतिगट किंमत.**<br>अ. १० शेळया + १ बोकड : रु. ८६,४००/-<br>ब. २० शेळया + १ बोकड : रु. १,६५.१६२/-<br>क. ५० शेळया + २ बोकड : रु. ३,९३,६००/-<br>ड. १०० शेळया + ४ बोकड रु. ७,८७,२२१/- |
| ६ | लाभार्थीची निवड | १. धनगर समाजाच्या लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.<br>२. महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>३. लाभार्थीने महामंडळाच्या प्रक्षेत्रावरून प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.<br>४. लाभार्थीची निवड शासनाने नियुक्त केलेली समिती करेल.<br>५. लाभार्थीला शेळीपालन व्यवसायाची आवड असणे आवश्यक आहे.<br>६. लाभार्थीला लिहिता-वाचता येणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | ७. लाभार्थीकडे १० शेळ्या + १ बोकड ह्यांच्याकरिता लागणारा चारा उत्पादनासाठी किमान अर्धा एकर, २० + १ शेळ्याकरिता, किमान १ एकर, ५० + २ शेळी गटाकरिता किमान २.५ एकर तर १०० शेळ्या + ४ बोकड ह्यांच्याकरिता किमान ५.५ एकर जमीन असणे आवश्यक आहे. ह्या व्यतिरिक्त शेळ्यांच्या वाड्यांसाठी गटनिहाय आवश्यकतेनुसार जमीन असणे आवश्यक राहील आणि सदर जमीन महामंडळाकडे तारण म्हणून द्यावी लागेल. गटनिहाय वाडे बांधकामास (खुली व बंदिस्त जागेसह) आवश्यक जागेचा तपशील खालीलप्रमाणे.--<br>वाडेसाठी जागा १० + १ गटासाठी ७५० चौ. फुट, २० + १ गटासाठी १५०० चौ. फुट, ५० + २ गटासाठी ३५०० चौ. फुट आणि १०० + ४ गटासाठी ७००० चौ. फुट<br>८. महामंडळ प्रचलित दर आणि धोरणानुसार लाभार्थ्यांना शेळ्या-मेंढ्यांचा प्रक्षेत्रावरुन पुरवठा करेल. सदर शेळ्या-मेंढ्यांचा प्रक्षेत्र ते लाभार्थीचे स्थळ ही वाहतूक व्यवस्था लाभार्थीस करावी लागेल.<br>९. लाभार्थ्यांना वाडे बांधकामाचे नकाशे देण्यात येतील त्याप्रमाणे त्यांना बांधकाम करावयाचे आहे. लाभार्थ्याला गटानुसार वाडे बांधकामाची मंजूर रक्कम दोन हप्त्यामध्ये देण्यात येईल. लाभार्थ्याने पहिला हप्ता वाडेबांधकाम सुरू करताना आणि दुसरा हप्ता पहिला हप्ता मिळाल्या-पासून महामंडळाच्या आर्किटेक्टनी तपासणी आणि मुल्यांकन केल्यानंतर (सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता व पशुधन विकास अधिकारी स्थानिक) देण्यात येईल. लाभार्थ्यांना ४५ दिवसांमध्ये वाडे बांधकाम पूर्ण करावयाचे आहे. वाडे बांधकामाची तपासणी आणि मूल्यांकन महामंडळाच्या आर्किटेक्टकडून झाल्यानंतरच शेळ्यांचा पुरवठा करण्यात येईल.<br>१०. लाभार्थीना महामंडळाच्या लेखी परवानगीशिवाय योजनेंतर्गत खरेदी केलेल्या शेळ्या, तारणपोटी दिलेली जमीन, वाडे विकता येणार नाहीत.<br>११. लाभार्थीला अनुदानासाठी विहित नमुन्यात करारनामा करून दयावा लागेल.<br>१२. लाभार्थी जी योजना राबविणार आहे, त्यानुसार त्याला दोन सक्षम जामिनदार द्यावे लागतील त्यापैकी एक जामिनदार शासकीय सेवेत कायम आस्थापनावर असणे बंधनकारक राहील.<br>१३. लाभार्थीने अनुदानाचा गैरवापर केल्यास अथवा कराराच्या अटी आणि नियमांचा भंग केल्यास अनुदान एक रक्कमी वसूल केले जाईल.<br>१४. जेव्हा-जेव्हा महामंडळाचे अधिकारी शेळ्यांचे गट तपासण्यास येतील तेव्हा लाभार्थीने शेळ्या दाखविणे बंधनकारक आहे.<br>१५. लाभार्थीला अनुदानातील खेळते भांडवल फक्त प्रथम वर्षाकरिताच दिले जाईल. पुढील वर्षापासून लाभार्थीने स्वतंत्र खेळत्या भांडवलाची व्यवस्था करणे आवश्यक आहे.<br>१६. लाभार्थीची शेळी/मेंढी मृत्यू पावल्यास सदर मृत शेळीचे शासनाच्या पशुधन विकास अधिकारी यांजकडून शवचिकित्सा करून घेणे, विमा कंपनीकडून मृत शेळी/मेंढीबाबत दावा दाखल करणे आणि त्याबाबतची नुकसान भरपाई मिळवून घेणे इ. जबाबदारी लाभार्थीची राहील. विमा कंपनीचे **नो टॅग नो क्लेम** असे धोरण असल्यामुळे, टॅग हरविल्यास विमा कंपनीला कळविण्याची जबाबदारी लाभार्थीची राहील.<br>१७. लाभार्थीची शेळी मृत्यू पावल्यास विम्याच्या दाव्यापोटी मिळणाऱ्या रक्कमेतून शेळी खरेदी करणे बंधनकारक आहे.<br>१८. लाभार्थीला आवश्यकतेप्रमाणे दरवर्षी विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणे, रोगप्रतिबंधक लसीकरण, जंत आणि गोचिड प्रतिबंधक उपाय योजना करणे, बंधनकारक राहील.<br>१९. लाभार्थीला संबंधीत प्रक्षेत्र व्यवस्थापक ह्यांनी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.<br>२०. लाभार्थीचे वाडे बांधकामासाठी दिलेल्या पैशातून वाडे बांधकाम पूर्ण केल्यानंतरच महामंडळाकडून शेळ्यांचा पुरवठा केली जाईल.<br>२१. शेळी गटाच्या संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी लाभधारकाची राहील.<br>२२. लाभार्थ्याला शेळयाऐवजी मेंढी गट घेण्याची मुभा राहील.<br>२३. लाभार्थ्याला शेळया/मेंढ्या महामंडळाच्या प्रक्षेत्रावरून आणि प्रचलित दरानुसार खरेदी करणे बंधनकारक राहील. |

**अ. महाराष्ट्रातील शेळयांच्या जाती व गुणवैशिष्ट्ये :-**

| **उस्मानाबादी शेळी** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१. शारीरिक गुणधर्म** | | | **२. वजने** | | | **३. पैदाशीचे गुणवैशिष्ट्ये** | | |
| १ | रंग | प्रामुख्याने काळा | १ | जन्मतः वजन | २.५ किलो | १ | वयात येण्याचा काळ | ७ ते ८ महिने |
| २ | कान | लोंबकळणारे | २ | पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे वजन | ३० ते ३५ किलो | २ | प्रथम गाभण राहतानाचे वय | ८ ते ९ महिने |
| ३ | शिंगे | मागे वळलेली | ३ | पूर्ण वाढ झालेल्या बोकडाचे वजन | ४५ ते ५० किलो | ३ | प्रथम विण्याचे वय | १३ ते १४ महिने |
| ४ | कपाळ | बर्हिवक्र | | | | ४ | नर-मादी करडांचे जन्माचे प्रमाण | १ : १ |
| ५ | उंची | ६५ ते ७० सें.मी. | | | | | | |
| ६ | छाती | ६५ ते ७०सें. मी. | | | | | | |
| ७ | लांबी | ६० ते ६५ सें.मी. | | | | | | |

| **संगमनेरी शेळी** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१. शारीरिक गुणधर्म** | | | **२. वजने** | | | **३. पैदाशीचे गुणवैशिष्ट्ये** | | |
| १ | रंग | प्रामुख्याने पांढरा | १ | जन्मतः वजन | नर २.४३ ± ०.११ किलो<br>मादी २.०८ ± ०.०९२ किलो | १ | वयात येण्याचा काळ | २४५.१९ ± ७.४२ दिवस |
| २ | कान | कान प्रामुख्याने लोंबकळणारे परंतु काही शेळ्यामध्ये उभे किंवा समांतर आढळतात | २ | पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे वजन | २३.७२ ± ०.७१ किलो | २ | प्रथम गाभण राहतानाचे वय | २८७.०९ ± १०.१६ दिवस |
| ३ | शिंगे | अंदाजे ८ ते १२% शेळ्या ह्या बिनशिंगी (भुंड्या) आढळतात, उर्वरित शेळ्यामध्ये शिंगे आढळतात. शिंगे सरळ (३०.६५%) किंवा मागे वळलेली आढळतात (६९.३५%). | ३ | पूर्ण वाढ झालेल्या बोकडाचे वजन | २४.२१ ± ०.३७ किलो | ३ | प्रथम विण्याचे वय | ४३२.१८ ± १२.७७ दिवस |
| ४ | कपाळ | प्रामुख्याने बर्हिवक्र (८७.७५%) सपाट (१०.१४%) आणि आंतर्वक्र (२.१०%). | | | | | | |

| **सुरती** (खानदेशी / निवानी) **शेळी** | | |
|---|---|---|
| **१. शारीरिक गुणधर्म** | | |
| १ | रंग | प्रामुख्याने पांढरा |
| २ | कान | लांबट आणि रुंद |
| ३ | कास | **चांगली मोठी** |
| ४ | शिंगे | **मागे वळलेली** |
| ५ | जन्मतः वजन | **२.१ किलो** |
| ६ | पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे वजन | **२५-३० किलो** |
| ७ | प्रथम विण्याचे वय | **२१ महिने** |
| ८ | दूध उत्पादन | दररोज एक ते दीड किलो आणि एका विताच्या हंगामात एकूण १२० ते १५० किलो |

| कोकण कन्याल | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **१. शारीरिक गुणधर्म** | | | | | | |
| १ | रंग | प्रामुख्याने काळा रंग नाकापासून कानापर्यंत दोन्ही बाजूस आणि पायावर पांढरे पट्टे आढळून येतात. | | | | |
| २ | कान | काळा रंग आणि पांढऱ्या रंगाच्या कडा, चपटे लांब आणि लोंबणारे असतात. | | | | |
| ३ | शिंगे | मध्यम आणि मागे वळलेली | | | | |
| ४ | कपाळ | काळ्या रंगाचे, चपटे आणि रुंद असते. | | | | |
| **२. उंची, वजने इ.** | | | | | | |
| १ | जन्मत: वजन | १.७ ते २.९ सरासरी २.२३ किलो | | | | |
| **२** | | **लिंग** | **शारीरिक वजन (किलो.)** | **उंची (सेंमी.)** | **छातीचा घेर (सेंमी.)** | **लांबी (सेंमी.)** |
| | | बोकड | ४९.९९ | ८४.१७ | ८३.२२ | ८१.५७ |
| | | शेळी | ३१.७७ | ७४.२४ | ७३.२९ | ७२.७३ |
| **३. पैदाशीचे गुणवैशिष्ट्ये** | | | | | | |
| या शेळ्यांची प्रजोत्पादन क्षमता समाधानकारक आहे आणि जुळ्याचे प्रमाण ४०.८५% आढळते. उहाळ्यामध्ये विणाऱ्या शेळ्यामध्ये जुळ्याचे प्रमाण जास्त आढळते. | | | | | | |

## ब. महाराष्ट्रातील मेंढ्यांच्या जाती व गुणवैशिष्ट्ये :-

| दख्खनी मेंढ्या | | |
|---|---|---|
| **शारिरीक गुणधर्म** | | |
| १. | रंग | ह्या मेंढ्यामध्ये काळा (५७%) पांढरा (२८%) आणि मिश्र रंग (१५%) असे रंग आढळतात.<br>**दख्खनी मेंढ्यांमध्ये लोणंद, संगमनेरी, सोलापूरी (सांगोला) आणि कोल्हापुरी या उपजाती** आढळतात. |
| २. | वजने | दख्खनी मेंढ्या मध्यम आकारच्या मेंढ्या असून त्यांची वजने आणि शारीरिक प्रमाणके खालीलप्रमाणे - |
| ३. | लोकर उत्पादन | |

| | प्रौढ नर | प्रौढ माद्या |
|---|---|---|
| अ) वजन (किलो) | ३८.४८ ± १.०६ | २८.५८ ± ०.११ |
| ब) लांबी (सें.मी.) | ६७.८८ ± ०.६९ | ६५.२१ ± ०.१० |
| क) उंची (सें.मी.) | ६७.४४ ± ०.७१ | ६३.७९ ± ०.०९ |
| ड) छातीचा घेर | ७७.९० ± ०.८७ | ७०.७५ ± ०.१० |

| | |
|---|---|
| सरासरी लोकर उत्पादन | ५८७ ग्रॅम्स |
| लांबी (सें.मी.) | ८.५८ ± ०.३२ |
| धाग्याची तलमता (मायक्रॉन) | ५२.४२ ± १.८६ |
| केसांचे प्रमाण (%) | ७३.७५ ± २.५४ |
| लोकर केसांची घनता (प्रति चौ.सें.मी.) | ७३४.४६ ± २८.९० |

| माडग्याळ मेंढ्या | | | |
|---|---|---|---|
| **शारीरिक गुणधर्म** | | | |
| १. | **रंग** | ह्या मेंढ्यामध्ये प्रामुख्याने पांढरा आणि त्यावर तपकिरी मोठे ठिपके आढळतात आणि हे माडग्याळ मेंढयांचे खास वैशिष्ट्ये आहे. | |
| २. | **नाक** | पोपटासारखे बर्हिवक्र नाक हे ह्या जातीचे दुसरे वैशिष्ट्ये आहे. | |
| ३. | **मान** | प्रौढ मेंढेनरामध्ये ४५ सें.मी. (१८ इंच) ते ५३ सें.मी. (२१ इंच) तर प्रौढ मेंढ्यांमध्ये ३० सें.मी. (१२ इंच) आढळते. | |
| ४. | **शिंगे** | दोन्ही लिंगामध्ये शिंगे आढळून येत नाहीत. | |
| ५. | **उंची** | प्रौढ मेंढेनराची सरासरी उंची खांद्यांपर्यत ८२ सें.मी. ते ८८ सें.मी., प्रौढ मेंढ्यांमध्ये ६३ सें.मी. (२५ इंच) ते ७५ सें.मी. (३० इंच) आढळते. | |
| ६. | **वजने** | जन्मतः वजन | ३.० ते ३.५ किलो |
| | | थानतुटीचे वजन | १८-२२ किलो |
| | | पूर्ण वाढ | ३५ ते ४० किलो |
| ७. | **प्रजनन क्षमता** | ◆ एकूण पैदाशीचा कालावधी - ७ ते ८ वर्षे<br>◆ या मेंढ्यांची प्रजनन क्षमता समाधानकारक आहे.<br>◆ जुळ्याचे प्रमाण : अर्ध्या टक्यापेक्षा कमी | |

**अ. महाराष्ट्रातील शेळ्यांच्या जाती :-**

| | |
|---|---|
| **उस्मानाबादी शेळी** |  |
| **संगमनेरी शेळी** |  |

| | |
|---|---|
| सुरती (खानदेशी / निवानी) |  |
| कोकण कन्याल |  |

## ब. महाराष्ट्रातील मेंढ्यांच्या जाती

| | |
|---|---|
| दख्खनी मेंढी |  |

| | |
|---|---|
| **माडग्याळ मेंढी** |  |

♦♦♦